
# printing® Area

ISSN 2394-5303

Issue-72, Vol-01 January 2021

Peer Reviewed International Refereed Research Journal




Editor
Dr.Bapu G.Gholap

14) Impact of Covid-19 (Corona virus) Pandemic Situation on the Role of ...
**Mrs. Rakte Jyoti Bhausaheb, Dist. Beed** ||78

15) Quest of the Self in Vilas Sarang's The Dhamma Man
**Shah Himanshu, Godhra, Gujarat** ||87

16) Role of Economic Environment and Entrepreneurship
**Dr.Songirkar Nitin Bhatu, Nashik (Maharashtra)** ||91

17) Comparative Preliminary Phytochemical Analysis of Cassia tora Linn: ...
**Santosh Kumar Tambrey & Neelima Pandey, Korba (C.G.)** ||95

18) Perception of Teacher Educators on Organizational Climate of District ...
**Dr. C.S. Vazalwar & Varsha Shashi Nath, Bilaspur, C.G., India** ||99

19) A Geographical study of Population growth and trends in Solapur city
**Dr. H.D.Wagalgave, Dist.Nanded** ||104

20) संताचे साहित्य व पर्यावरण
**प्रा. प्रतिभा कृष्णराव आवंडकार (थोरात), अंजनगाव सुर्जी** ||107

21) सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेकरीता लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण व ...
**डॉ. प्रदीप रा. भानसे, जि. गोंदिया** ||110

22) स्त्री संरक्षणात महिला आयोगाची भूमिका
**प्रा.डॉ. मीना भगवानराव बोर्डे, जालना** ||119

23) भारतीय संविधान आणि मानवाधिकार
**प्रा.डॉ.चौधरी कालीदास पंढरीनाथ, गेवराई** ||121

24) बौध्दिक संपदा हक्क आणि ग्रंथालये
**प्रा.डॉ.गव्हाणे एम.पी., जि.बीड** ||124

25) ल. सी. जाधव यांच्या कवितेचे स्वरूप व मूल्यमापन
**मिनाक्षी गोणारकर, पुणे** ||126

26) साठोत्तरी साहित्यप्रवाचा 'स्त्री' कडे पाहण्याचा दृष्टिकोन
**प्रा.कांबळे डी.आर., सोनखेड** ||129

27) शास्त्रीय संगीताच्या उत्कर्षाकरीता संगीत शिक्षकाला कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते
**डॉ.जयश्री विश्राम कुळकर्णी, जि.अमरावती** ||132

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

24

# बौध्दिक संपदा हक्क आणि ग्रंथालये

प्रा.डॉ.गव्हाणे एम.पी.
ग्रंथपाल,
कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा, ता.पाटोदा, जि.बीड

**प्रस्तावना :**

विद्यमान जग हे ज्ञानाचे,विज्ञानाचे आणि तंत्रज्ञानाचे जग म्हणून ओळखले जाते. ज्ञान,माहिती आणि ज्ञानावर अधारित निर्मिती साधने यास अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले आहे. यामुळे ज्ञान निर्मितीस प्रोत्साहन प्राप्त झालेले आहे. ज्ञान निर्मितीस प्रोत्साहन प्राप्त होण्याच्या दृष्टीने जागतिक पातळीवर विविध परिषदा,संमेलने यामध्ये चर्चा होऊन बौध्दीक संपदा हक्क ही संकल्पना अस्तित्वात आली. मुद्रण कलेचा विकास होत असताना सुरुवातीस मुद्रकाना स्टेशनटस असे संबोधण्यात येई. या मुद्राकांनी १५३४ च्या कालखंडात महत्वपुर्ण अशा पाश्चात्य ग्रंथाच्या निर्मितीचे संपादन केले. १५५६ मध्ये मॅरीने अनेक धार्मिक अडथळयांना सामोरे जात मुद्राकांची कंपनी स्थापन केली. यामुळे निर्मिती वस्तुच्या हक्कांना एक शक्ती व संरक्षण प्राप्त झाले.यामुळे मुद्रकांला आपल्या मुद्रीत साधनांची (ग्रंथाची) नोंदणी करणे आवश्यक ठरले. मुद्रकांच्या संघटना व प्रबोधन याद्वारे १७१० मध्ये कॉपीराईट ॲक्टला निश्चित स्वरुप प्राप्त झाले. आंतरराष्ट्रीय स्तरावर ब्रिटन,अमेरिका या राष्ट्रांच्या प्रयत्नांनी १९११ चा कॉपीराईट कायदा अस्तित्वात आला. त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा होऊन पुढे १९५६ चा कॉपीराईट कायदा अस्तित्वात आला. त्यामध्ये अनेकवेळा बदल होऊन ,आकाशवाणी,चित्रपट आणि टंकलिखित आकृतीबंधाचा यामध्ये समावेश करण्यात आला.

मुद्रित साहित्यचे पुनरमुद्रण करत असताना लेखक,प्रकाशक वा एका व्यक्तिकडे लेखकाने पुनरमुद्रणाचे हक्क दिलेले असतात असे हक्क लेखक स्वत:कडे जवळाचा नातेवाईक अगर मित्राकडे किंवा एखादया संस्थेकडे देतो. यासाठी पुस्तकाच्या शिर्षक पृष्ठाच्या मागील बाजूस (c) असे संक्षेपदर्शक चिन्ह असते. मुळत: कायदया संदर्भातील धोरण हे लेखक आपल्या बौध्दीक शक्तीच्या सहय्याने तो एक निर्मिती करीत असतो. या निर्मितीसंदर्भात त्या लेखकाचा हक्क अबाधित असला पाहिजे. यामागची मुलभूत भुमिका ज्ञानसाधन निर्मिती ही लेखकाची हक्क असलेली उत्पादिकता असते. अशा बाबीचे प्रसरण वा वितरण होत असताना त्याचे मुल्य मोबदला निर्मात्याला मिळाला पाहिजे. जर त्या लेखकाला त्याचा मोबदला मिळाला नाही तर नवनिर्मितीस खीळ बसेल.खज्याअर्थाने स्वीत्झर्लंड मधील बर्न या गावी भरलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत लेखकांचा बौध्दीक संपदा हक्क मान्य करुन हा हक्क लेखकाच्या हयातभर शिवाय, त्यांच्या मृत्यूनंतर लेखकाने सुचविलेल्या वारसास ५० वर्षापर्यत मानण्याचे ठरते. त्यानंतर ते लेखन सार्वजनिक मालकीचे ठरविण्यात आले. लेखकांना नवनिर्मितीस चालना मिळविण्याकरिता बौध्दिक संपदा हक्काची निर्मिती करण्यात आलेली आहे.

**तंत्रज्ञानामुळे झालेल्या अमुलाग्र बदलाचा विचार होऊन**

A. Berne Convention

B. Berne Convention for the Protection of performers,

c. TRIPS (Trade Related Intellectual Property Right.)

जागतीक स्तरावर हा बदल होत असताना साहजिकच त्याचे पडसाद भारतासारख्या विकसनशील देशात उमटून कालसापेक्ष बौध्दीक संपदा कायद्यात अस्तित्व विकसीत होत राहिले.

**भारता बौध्दिक संपदा कायदयाची वाटचाल :**

विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात बौध्दीक संपदा कायदयाचा प्रवेश झाला. १९११ साली ब्रिटीश छत्राखाली अवलंब करण्यात आला. १९१४ साली त्यामध्ये सुधारणा करण्यात आली , खज्या अर्थाने १९५७ साली स्वातंत्र्यानंतर स्वामित्व कायद्याची नव्या स्वरुपात अंमलबजावणी झाली. परत १९८३ साली या कायदयात सुधारणा करण्यात आली. या बदलाला गॅट करारामुळे महत्व प्राप्त झाले. तंत्रज्ञानाच्या बदलामुळे माहितीचे आदानप्रदान वाढले. १९८४ मध्ये या कायदयाचे उल्लंघन करण्या-या विरुध्द गंभीर शिक्षेची तरतूद करण्यात आली. त्यामुळे या कायदयाची अमलबजावणी करता येते.

**ग्रंथालये आणि कायदयातील (IPR) तरतूदी :**

भारतामध्ये बौध्दीक संपदा करदयाअंतर्गत असणा-या तरतुदी कलम ५१ मध्ये अंतरभुत करण्यात आलेल्या आहेत. तर प्रत्यक्ष कायदेभंगाचे स्वरुप कलम ५२ मध्ये नमुद केलेले आहे.कलम ५१(अ) एखादया स्वामित्व प्रधान व्यक्तिकडुन अथवा प्रबंधकाकडुन परवानगी न घेता स्वामित्व धारण केलेल्या व्यक्तिच्या अधिकारातील काही कृत्य केल्यास अथवा नफा कमावण्याच्या उद्देशाचे एखादा प्रयोग करणे म्हणजे कायदयाचा भंग आहे. मग संबंधीताला त्या कायदयाची

माहिती नसली तरीही कायदयाचे ते उल्लंघन होईल.

कलम ५१(ब) जेव्हा एखादी व्यक्ति :

एखादी साहित्यकृती भाडयाने देत असेल किंवा साहित्याच्या झेरॉक्स प्रती काढून विकत असेल किंवा त्या साहित्याची जाहिरात करीत असेल तसेच त्या साहित्याचे व्यापार करत असेल किंवा स्वामित्व अधिकार असणा-या व्यक्तिच्या हितास जाणिवपूर्वक बाधा आणत असेल, स्वामित्व कायदयाचा भंग करुन एखादया साहित्यकृतीच्या प्रती आयात करुन भारतात आणत असेल तर यासाठी ५२ मधील तरतुदी महत्वाच्या आहेत.

**स्वामित्व कायदयाचा भंग होणार नाही अशी कृती :**

खालील बाबतीत स्वामित्व कायदयाचा भंग झाला नाही असे समजले जाणार नाही.

१) एखादया साहित्यकृतीच्या संगीताचा कलात्मककृतीसाठी केलेला वापर.

अ.संशोधन अथवा खाजगी अभ्यास.

ब. एखादया साहित्यकृतीचे समिक्षण.

२) एखादया साहित्यकृतीचे, नाटकाचे ,संगीत अथवा कलात्मक कृतीचे ताज्या घडामोडीबाबत वृत्त देण्याकरिता केलेला वाजवी वापर.

अ. नियतकालिक,वृत्तपत्र अथवा मासिकात केलेला वापर.

ब. नभोवाणी, चित्रपट अथवा छायाचित्रात केलेला वापर.

याशिवाय याच कलमातील अन्य तरतुदीनुसार न्यायालय, विधानमंडळ आणि सरकारी कामाकरिता आवश्यक असल्यास प्रत तयार करण्याची परवानगी दिली असल्यास कलम (b) अंतर्गत तरतुद शैक्षणिकदृष्टया महत्वाची आहे.

अ. शिक्षकाने अध्ययन अथवा अध्यापनासाठी तयार केलेली प्रत.

ब. परीक्षेचा भाग म्हणून वापरल्यास.

. त्या प्रश्नांची उत्तरे म्हणून तयार केल्यास.

अशा तरतुदी प्रत्यक्षात अंतरभुत करण्यात आलेल्या असल्यातरी देखील कलम (१) प्रमाणे स्वामित्व धारण करणाज्या व्यक्तिकडुन परवानगी / संमत्ती घेणे व परवानगी नंतर स्वामित्व अधिकार असणाज्या व्यक्तिस निर्धारीत रक्कम देणे हे बंधनकारक आहे. तसेच एखादया ग्रंथाच्या प्रती उपलब्ध नसल्यास संबंधीत लेखकाची परवानगी घेऊन जास्तीत जास्त तीन प्रतीची निर्मिती करता येते. तसेच एखादया ग्रंथाची मुक्तपणे निर्मिती करण्यासाठी लेखकाच्या मृत्यूनंतर साठ (६०) वर्षे व एखादा ग्रंथ एकाहुन अनेक लेखकाने लिहीला असेल तर शेवटच्या लेखकाच्या मृत्यूनंतर ६० वर्षे निर्धाराने केलेला आहे.

**बौध्दीक संपदा कायदा आणि ग्रंथालय :**

ग्रंथालय आणि बौध्दीक संपदा कायदा यांचा निकटचा संबंध आहे. म्हणून या कायदयाची माहिती ग्रंथालय क्षेत्रातील व्यक्तिना असणे जरुरीचे आहे. प्रारंभी हा कायदा औदयोगिक ग्रंथालये, संशोधन आणि विशेष ग्रंथालये यांच्या संबंधीत आहे असे जाणवत होते. परंतु माहिती तंत्रज्ञानामुळे संगणक व दूर प्रसारण यामुळे याचा वापर सर्वदुर प्रमाणात होत असल्याचे आज पहावयास मिळते. संशोधन व त्यावर आधारित उपयोगाची माहिती व नवनिर्मिती याचा अवलंब केला जात आहे. अशा नव्या माहितीचा शोध ग्रंथालयाद्वारे घेणे शक्य झाले असल्याने आजकाल सर्वस्तरीय ग्रंथालयानी याबाबत जागरुक राहणे गरजेचे आहे. पुर्वी असा शोध केवळ संशोधन, औदयोगिक संस्थाशी संबंधीत ग्रंथालयाद्वारेच घेतला जात असे. पण आजकाल शोध घेणे व्यापक स्वरुपात शक्य झाल्यानेच सर्वस्तरीय ग्रंथालयानी ही दक्षता घेणे गरजेचे आहे.

**ग्रंथालयानी घ्यावयाची दक्षता :**

अ. साहितयकृतीचे सादरीकरण.

ब. संगणक अज्ञावल बेकायदीशीर मार्गाने उपयोगात आणणे.

. इतर दृकश्राव्य साधनाचा (उदा.सीडीज,टेप्स) बेकायदेशीर उपयोग करणे.

अशा वाचनसाहित्याचा वापर हा ग्रंथालयाकडुन दोन प्रकारे होत असतो.

A. प्रत्यक्ष ग्रंथालयांतर्गत अभ्यासासाठी व उपयोगासाठी

B. ग्रंथालयाबाहेर.

प्रत्यक्ष ग्रंथालयाद्वारे एखादया साहित्याच्या व इतर प्रलेखांच्या प्रती करुन केला गेलेला वापर हा गैरवाजवी ठरतो.कारण ग्रंथालयांनी एका प्रलेखाच्या अनेक प्रती करुन त्या वाचकांना ठराविक किंमत घेऊन जर दिल्या जात असतील तर तो गुन्हा आहे. आणि एखादया प्रलेखाच्या प्रती बाजारात नसतील तर अशावेळी ग्रंथालयांनी बौध्दीक संपदा असणाज्या लेखकाच्या परवानगीने प्रलेखाच्या जास्तीत जास्त तीन प्रती ग्रंथालयात ठेवून त्या वाचकांना उपलब्ध करुन देण्याची परवानगी लेखक देऊ शकतात. त्यासाठी बौध्दीक संपदा हक्क धारण करणा-या व्यक्ति वा संस्था त्याच्याकडुन रजिस्टर लेखी परवानगी घेऊन अशा प्रलेखांच्या प्रती ग्रंथालयात उपलब्ध करुन देण्याची सुविधा या कायदयांतर्गत करण्यात आलेली आहे.

ग्रंथालयातंर्गत वापर व बहिर्गत वापर हा मोफत स्वरुपात उपलब्ध करुन दिला जात असल्यास व त्याचे स्वरुप नफा मिळविणे, शैक्षणिक प्रसार, संशोधन यासाठी नसेल तर त्यास ग्राहय वापर किंवा

चांगला वापर (fair use) असे मानण्यात येते.

आजकाल ग्रंथालयातील वाचनसाहित्य उपलब्ध करुन देणस माफक शुल्क आकारण्यात येत असले तरी देखिल ती ग्राहक सेवाच संबोधली जाते. यास्तव अशा स्वरुपाचा वापर बौध्दीक संपदा हक्क कायदयाच्या कक्षेत अंतर्भूत होऊ शकतो.

**संदर्भ ग्रंथ :**

१) कांठेड, अमरसिंह, मानवाधिकार एवं भारतीय न्यायपालिा की भुमिका.

२) गोविलकर वि.म. , बौध्दिक संपदा अधिकार डायमंड पब्लिकेशन.

३) धाकड, ज्ञानवती, बौध्दिक सम्पदा विधियाँ : सेन्ट्रल लॉ पब्लिकेशन.

४) बाबेल, बसन्तीलाल ; बौध्दिक सम्पदा कानुन : सेन्ट्रल लॉ एजन्सी

५) बिरजे, सुधिर जयराम , बौध्दिक संपदा कायदे : अजिज लॉबुक डेपो

६) मिश्र, जयप्रकाश , बौध्दिक सम्पदा अधिकार : सेन्ट्रल लॉ पब्लिकेशन.

७) Anja,V.K. Law Relatting to Intellectual Property Right.

८)Choudhary, Peggy & Alah Zimmerman. Protection you Inellecua Property Right.

९) Curnish & Llewelyn. Intellectual Property : patents, copynight, Trade Marks & Trade Marks & Allied Rights.

१०) Pandey, Neeraj & Dharni, Khushdeep, Intellectual Property Right.

११) Reddy, S.V. Damodar, Intellectual Property Rioght Law & Pracice : ASIA Law House १९६५.

□□□

**25**

# ल. सी. जाधव यांच्या कवितेचे स्वरूप व मूल्यमापन

मिनाक्षी गोणारकर
संशोधन विद्यार्थिनी,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

***********

**सारांश —**

कविता हा साहित्यातील महत्वाचा प्रकार आहे. कवितेतून जीवन कळते, समजते व उमगते. ज्यामध्ये कोणतीही भाषा किंवा मन:स्थिती कोणत्याही भाषेद्वारे व्यक्त केली जाते. मुळात कविता हा कवीचा आत्मशोध असतो. मग तो शोध कुणी निसर्गाच्या विविध रूपांमधून घेईल तर कुणी माणसामाणसांमधील नातेसंबंधांची उकल त्या — त्या कवितेतून करील तर कुणी आपल्याच प्रश्नांमधून माणसाच्या जगण्याची, सुखदु:खाची उकल करील तर कुणी आपल्याच अनाकलनीय आंतरिक विश्वाचा तळ शोधून काढण्यात मग्न होईल. ल. सी. जाधवांनीं सुद्धा जे अनुभवलं, जी अस्वस्थता आली ती विरून जाऊ न देता प्रतिभेचे दलित— ललित, शिशिराचे आर्त— निसर्गाचे अनुबंध, नाही लागत थांग — निगूढ सारे, गतस्मृतीची पडझड या सारख्या कविता मांडल्या आहेत.

**कळीचे शब्द** — अनाकलनीय अंतरिक विश्व, प्रतिभेचे दलित — ललित, निसर्गाचे अनुबंध

**प्रस्तावना—**

ल. सी. जाधवांनी वयाच्या ६०— ६५ व्या वर्षी लिखानाला सुरुवात केली असल्यामुळे जीवनातील एवढ्य वर्षाच्या अनुभवाचे संचित त्यांच्या गाठीशी जमले होते. त्याचा परिपाक म्हणजेच यांच्या हातून झालेले हे कसदार लेखन. सृजनशीलता अशी आंतरिक प्रेरणेने उसळी घेऊन वर येतच असतो. याचा प्रत्यय जाधवांच्या लेखनामधून येतो. जाधवांनी जगण्यातील